MHLA050006602018

विशेष दिवाणी दावा क्र. १३/२०१८
विजया वगैरे वि. भागवत वगैरे

## आदेश नि.क्र. ६२ वर

प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी हा अर्ज दाखल करुन या प्रकरणी त्यांच्याविरूध्द नि.क्र. ५५ वर उलट तपास नाही असा झालेला आदेश रद्द करण्याची मागणी केली आहे.

२. या अर्जावर वादींनी म्हणणे देऊन अर्जास तीव्र आक्षेप घेऊन अर्ज नामंजूर करण्याची मागणी केली आहे.

३. दोंन्ही बाजुच्या वकिलांचा युक्तिवाद ऐकला. प्रतिवादी क्र.१ ते ४ यांच्या वकीलांचे म्हणणे असे की प्रतिवादी क्र.१ आजारी असल्याने प्रतिवादी न्यायालयात हजर राहिले नाहीत व आवश्यक ती माहिती दिलेली नाही. त्यामुळे वादी क्र.१ चा उलटतपास घेण्यात आलेला नाही. वादीच्या वकीलांचे म्हणणे असे की वादी क्र. १ ने दिनांक २२-२-२०२२ रोजी सरतपास दिला होता व दिनांक १५-९-२०२२ रोजी वादीविरूध्द उलटतपास नाही असा आदेश पारीत झाला. वादीने अर्जामध्ये खोटे कारण नमूद केले आहे. त्यामुळे सदरचा अर्ज नामंजूर करावा.

४. सदरचा दावा हा मालकी घोषीत होवून मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. त्यामुळे दोन्ही पक्षकारांचे हक्क व अधिकार गुणदोषावर ठरवण्यासाठी वादी क्र.१ उलटतपास घेण्याची संधी प्रतिवादी क्र.१ ते ४ यांना देणे न्यायोचित होणार आहे. तथापी वादीने दिनांक २२-२-२०२२ ते दिनांक १५-९-२०२२ या कालावधीत उलटतपास का घेवू शकले नाही याचे संयुक्तिक कारण दिलेले नसल्याने सदर अर्ज मंजूर करतांना वादीवर खर्च बसवणे आवश्यक आहे. म्हणून मी खालील आदेश देतो.

**आदेश**

नि. क्र. ५५ वर प्रतिवादी क्र.१ ते ४ विरुध्द वादी क्र. १ चा उलट तपास नाही हा झालेला आदेश खर्च रक्कम रू. ३००/– वादींना देण्याच्या अटीवर रद्द केला आहे.

Digitally signed by PRASAD ANANT SAVADIKAR
Date: 2023.01.05 17:01:58 +0530

(प्र. अ. सवदीकर)

दिनांक ०५/०१/२०२३. दिवाणी न्यायाधीश व. स्तर, अहमदपुर